महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

CIN-U40109MH2005SGC153645

# संचालक (संचालन) यांचे कार्यालय

दूरध्वनी :६९८५२२०० विस्तार : २६०१ /२६४७५१२८ (वै),.
Email :dirop@mahavitaran.in
प्लॉट नं.जी-९, प्रकाशगड बिल्डिंग, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.

**संचालक (संचालन)/क्र.३३२३०** **दि.२४.०९.२०२६**

## परिपत्रक

**विषय: विद्युत वितरण यंत्रणेशी संबंधित विद्युत वाहिन्या/उपकरणांवर अनधिकृत व्यक्तींकडून कामे करून घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत.**

**संदर्भ:** १. विद्युत अधिनियम २००३, कलम ५३ मधील विद्युत सुरक्षितते संबंधी तरतुदी.
२. Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2023 व त्यातील वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा.
३. कंपनीचे प्रचलित सुरक्षा विषयक नियम, स्थायी आदेश, परिपत्रके, कामाचा परवाना इत्यादी संबंधी सूचना.

------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत वितरण यंत्रणेचे सुरक्षित संचालन, देखभाल व दुरुस्ती करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारी तात्काळ सोडवणे हे प्रत्येक संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. यासाठी क्षेत्रिय कार्यालयांतर्गत तारमार्ग संवर्गामध्ये प्रधान तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ, तंत्रज्ञ यांची नादुरुस्त वितरण रोहित्र बदलणे, DO Fuse बदलणे, विद्युत वाहिनीवरील बिघाड शोधणे, वीज पुरवठ्या संबंधी तक्रारी सोडविणे, वीज देयकांची रक्कम जमा करणे, वीज ग्राहकांचे वीज मीटर काढून आणणे इत्यादी कामे करण्यासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. तथापि, काही तारमार्ग कर्मचारी यांच्यांकडून सदरची कामे पूर्ण करण्यासाठी खासगी व्यक्ती/अनधिकृत मनुष्यबळाचा वापर केल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच अशा प्रकरणी क्षेत्रिय व सांघिक कार्यालय स्तरावर तक्रारी प्राप्त होत आहेत.

२. कंपनीच्या कामकाजासाठी संबंधित कर्मचाऱ्याने खासगी व्यक्ती/अनधिकृत मनुष्यबळ यांचा वापर करणे ही बाब अत्यंत गंभीर असून यामुळे विद्युत/यांत्रिक अपघात होउन संबंधित व्यक्ती, कंपनीचे कर्मचारी यांना प्राणांतिक/अप्राणांतिक अपघात झाल्याचे तसेच ग्राहक आणि कंपनीच्या मालमत्तेस हानी पोहोचल्याचेही निदर्शनास आलेले आहे. अशा मनुष्यबळाच्या वापरामुळे कंपनीची प्रतिमा जनमानसात मलीन होत असून, कंपनीच्या विविध स्तरांवर स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्राहक यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

३. Central Electricity Authority (Measures relating to Safety and Electric Supply) Regulations, 2023 मधील Regulation 3 नुसार केवळ अधिकृत व्यक्ती हा वीज वितरण सेवा संबंधी कामे करू शकतो किंवा विद्युत वाहिन्या व विद्युत उपकरणांवर काम करण्यास पात्र असतो. त्यामुळे अनधिकृत, अपात्र अथवा कंपनीद्वारे अधिकृत नामनिर्देशित न केलेल्या खासगी व्यक्तीस कंपनीच्या विद्युत यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचे काम करण्यास परवानगी देणे, त्याच्याकडून काम करून घेणे हे कृत्य बेकायदेशीर व अनधिकृत स्वरूपाचे आहे. तसेच कंपनीच्या सेवाविनियमांनुसार गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीच्या कृत्यांमध्ये मोडणारे आहे.

४ .त्यामुळे अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून कंपनीचे कोणतेही काम केल्याचे अथवा अशा प्रकारच्या गैरवर्तणुकीमुळे संबंधित व्यक्ती, कंपनीचे कर्मचारी, ग्राहक यांना प्राणांतिक/अप्राणांतिक अपघात झाल्याचे व कंपनीच्या मालमत्तेस हानी पोहोचल्याचे निदर्शनास आल्यास अशा प्रकरणी विभागीय स्तरावर चौकशी करण्यात यावी. तसेच चौकशीअंती सेवाविनियमातील तरतुदींनुसार दोषी कर्मचाऱ्यांविरूध्द बडतर्फी / सेवासमाप्ती सारखी कठोरतम शिक्षा ठोठावण्यात यावी. याबाबत क्षेत्रिय कार्यालयातील मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये विद्युत वितरणाच्या कामांमध्ये अनधिकृत मनुष्यबळाचा वापर होत नसल्याची खातरजमा वेळोवेळी करावी.

24.9.26

**संचालक (संचलन)**

प्रति,

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.